केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-इतर उपक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र तसेच राज्य हिस्सा निधी वितरीत करण्याबाबत. ((लेखाशिर्ष ४४०२ २६९२ कें. हि.)आणि (लेखाशिर्ष ४४०२ २७०७ रा.हि.))

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७/प्र.क्र.२३ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - २० जानेवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७..
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) केंद्र शासन ग्रामीण विकास मंत्रालयाचे पत्र क्र. १९-२७/२०१५- RFS- III , दि. ०९ ऑक्टोबर, २०१७.
५) ग्रामविकास व जलसंधारण विभागाची नस्ती क्र. वपायं- २०१७ / प्र.क्र.१७५ (भाग-१) / जल-८.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना -इतर उपक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मागणी क्र.टी-६, ४४०२, मृद व जलसंधारणावरील भांडवली खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) (०८) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - इतर उपक्रम- मृदसंधारण उपयोजनेमार्फत जमिनीचा विकास, लेखाशिर्ष- ४४०२ २६९२ आणि त्यास समरुप राज्य हिस्सा (०१) (०९) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - इतर उपक्रम- मृदसंधारण उपयोजनेमार्फत जमिनीचा विकास, ४४०२ २७०७ या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अनुक्रमें रु.१०००.०० लाख आणि रु. ५००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाने त्यांच्या वाचा क्र. ५ येथील प्रस्तावान्वये केंद्र शासनाकडून प्राप्त रु. ४२७.५० लाख इतका निधी वितरीत करण्याच्या केलेल्या विनंतीस अनुसरुन मागणी क्र.टी-६, ४४०२, मृद व जल संधारण यावरील भांडवली खर्च , ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) (०८) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - इतर उपक्रम मृदसंधारण उपयोजनेमार्फत जमिनीचा विकास, ४४०२ २६९२ या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित निधीपैकी केंद्र शासनाकडून प्राप्त रु. ४२७.५० लाख ( अक्षरी रुपये चार कोटी सत्तावीस लाख पन्नास हजार फक्त ) आणि त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (०९) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - इतर उपक्रम- मृदसंधारण उपयोजनेमार्फत जमिनीचा विकास, ४४०२ २७०७ या लेखाशिर्षाखाली रु. २८५.०० लाख (अक्षरी रुपये दोन कोटी पंचाऐंशी लाख फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रकरणी नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी

विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सन २०१६-१७ आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ४५७ /अर्थोपाय, दि. ०२-११-२०१७ अन्वये दिलेल्या मंजूरीस अधिन राहून निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची ग्राम विकास व जलसंधारण विभागाने खात्री करावी.

८ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२०१५२६१४२०२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.01.20 16:27:08 +05'30'

**रविंद्र दि. औटे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. सचिव,( जलसंधारण) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.

४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
०९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जल- ०८, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन-०५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.